# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

## ४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

☎ २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in


**तांतडीचे / कालमर्यादा २०/०४/२०१९**

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(ब)/तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक/२०१९/ 1666 दिनांक : 12 APR 20

प्रति,

मा. संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे.
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, कराड.
प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी व संशोधन महाविद्यालय, अवसरी.
प्राचार्य, शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, कराड.
प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे/कराड/कोल्हापूर/सोलापूर/मिरज/अवसरी.
प्राचार्य, शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव.

**विषय : निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) हे पद पदोन्नतीने भरणेबाबत..**

संदर्भ : (१) महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, अधिसूचना क्रमांक न्यायाप्र-२२१३/(१४१/१७)/तांशि-२, दिनांक ०९/०१/२०१९.
(२) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील पत्र क्रमांक १२/आस्था(१)/२०१९/२७, दिनांक २२/०१/२०१९.
(३) या कार्यालयाचे पृष्ठांकन क्रमांक तंशिविकापु/आस्था-३(ब)/तां.प्र.शा.सहा./२०१९/४२७, दिनांक २५/०१/२०१९.

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त शासकीय संस्थांमधील **निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) (वेतन स्तर - एस ८ : रुपये २५५००-८११००/-)** ही पदे पदोन्नतीने भरण्याचे प्रस्तावित आहे.

निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदाच्या सेवा प्रवेश नियमानुसार सदर पदासाठी प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पद धारण करणा-या व त्या पदावर ५ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या, आणि ज्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा भौतिकशास्त्र व रसायनशास्त्र या विषयांसह उत्तीर्ण केली आहे अशा व्यक्तींमधून ज्येष्ठता अधिन पात्रता या निकषावर योग्य त्या व्यक्तींच्या पदोन्नतीने भरण्यात येतील.

सबब आपल्या संस्थेतील जे प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) पदावरील कर्मचारी निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदासाठी आवश्यक असलेली अर्हता धारण करीत असतील त्यांची माहिती व त्यांचे अर्ज खालील प्रपत्रामध्ये भरुन त्वरित या कार्यालयास आवश्यक त्या कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रतींसह सादर करावी.

| **अ. क्र.** | **कर्मचा-याचे संपूर्ण नांव** | **प्रवर्ग व जात** | **जन्म दिनांक** | **मूळ नेमणूक दिनांक** | **शैक्षणिक अर्हता (उत्तीर्ण झाल्याच्या वर्षासह)** | **जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केले आहे किंवा कसे ?** | **शेरा / अभिप्राय** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

निदेशक (तांत्रिक प्रयोगशाळा सहाय्यक) पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने, याबाबतीत करण्यात आलेल्या नियमानुसार हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केलेल्या नसतील किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट मिळालेली नसेल, तर तिला सदर परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.

तसेच सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक संचलन प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. त्याच प्रमाणे सदर पदावर नियुक्त केलेल्या व्यक्ती या विभागांतर्गत कोणत्याही शासकीय संस्थेत बदलीस पात्र ठरतील.

कर्मचा-यांचे संस्थेतील उपलब्ध अभिलेख व सेवापुस्तके यामधील नोंदींवरुन, तसेच कर्मचा-यांकडून त्यांची शैक्षणिक अर्हतेची प्रमाणपत्रे, दाखले इत्यादी घेऊन तपासावीत व माहिती या कार्यालयास सादर करावी.

तसेच आपल्या संस्थेतील प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-याची माहिती या कार्यालयास प्राप्त न झाल्यास, तसेच पाठविलेल्या माहितीमध्ये कांही त्रुटी आढळल्यास त्यास सर्वस्वी संबंधित कर्मचा-यांना जबाबदार धरण्यात येईल याची त्यांनी नोंद घ्यावी., तसेच सदरचे पत्र आपल्या संस्थेतील सर्व प्रयोगशाळा सहाय्यक (अतांत्रिक) कर्मचा-यांच्या निदर्शनास आणून त्याची पोहोच घ्यावी व पुढील कार्यवाही करावी. **सदर माहिती दिनांक २०/०४/२०१९ पर्यंत या कार्यालयास सादर करावी.**

(डॉ. दि. रा. नंदनवार)
प्र. सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना माहिती व पुढील कार्यवाहीकरिता :
त्यांना सूचित करण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करावे.